


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक १९४ • गुरुवार दि.३० एप्रिल २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## विधान परिषद निवडणूक बिनविरोध?

### १० जागांसाठी १० उमेदवार; अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस



मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधान परिषदेच्या एकूण १० जागांसाठी निवडणूक प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून आज (३० एप्रिल) उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे. विशेष म्हणजे या १० जागांसाठी एकूण १० उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवडणूक जवळपास बिनविरोध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भारत निवडणूक आयोग यांनी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार १२ मे २०२६ रोजी मतदान पार पडणार आहे.

या निवडणुकीत ९ जागांसाठी नियमित निवडणूक तर एका जागेसाठी पोटनिवडणूक होत आहे. अंतिम दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी राजकीय नेत्यांची लगबग पाहायला मिळाली. भारतीय जनता पक्ष कडून सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रमोद जठार आणि प्रज्ञा सातव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे गट) कडून नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू यांना संधी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) कडून झिशान सिद्दीकी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर महाविकास आघाडीकडून अंबादास दानवे यांना उमेदवारी देण्यात आली असून ते शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे प्रतिनिधित्व करणार आहेत.विधान परिषदेचा एक सदस्य निवडून येण्यासाठी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे. विधानसभेतील संख्याबळा-नुसार महायुतीचे पारडे जड असल्याचे दिसत आहे. भाजप (१३१), शिवसेना शिंदे गट (५७) आणि राष्ट्रवादी अजित पवार गट (४०) या बळावर महायुतीचे ८ उमेदवार सहज विजयी होण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीचे एकूण संख्याबळ ४६ असल्याने त्यांना केवळ एकच जागा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, या **पान ४ वर**

## कारला लागलेल्या आगीत पाच जणांचा कोळसा

### मुंबई-दिल्ली एक्स्प्रेस वेवर विचित्र अपघात

जयपूर:मुंबई-दिल्ली एक्स्प्रेस वेवर बुधवारी रात्री हृदय पिळवटून टाकणारा भीषण अपघात घडला. राजस्थानमधील अलवर जिल्ह्यातील लक्ष्मणगढ पोलीस ठाण्याच्या हद्दीत मौजपूरजवळ धावत्या कारने अचानक पेट घेतल्याने कारमधील पाच जणांचा जिवंत जळून मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन महिला, एक पुरुष आणि एका लहान मुलीचा समावेश असून सर्वजण मध्य प्रदेशातील श्योपूर जिल्ह्यातील रहिवासी होते.

ही घटना रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास एक्स्प्रेस वेवरील चॅनल क्रमांक ११५/३०० जवळ घडली. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित कार सीएनजी आणि पेट्रोल या दोन्ही इंधनावर चालणारी होती. प्रवासादरम्यान अचानक सीएनजी गळती सुरू झाली आणि काही क्षणांतच कारने भीषण आग घेतली. आग एवढ्या वेगाने पसरली की कारमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही.मृत कुटुंब वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी गेले होते आणि परतीच्या प्रवासात मुंबईकडे येत होते. अपघातावेळी कारमधील बहुतांश जण झोपेत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आग लागल्याचे लक्षात येण्यापूर्वीच परिस्थिती हाताबाहेर गेली.दरम्यान, चालक विनोद कुमार यांनी प्रसंगावधान राखत धावत्या कारमधून उडी मारली. त्यामुळे त्यांचा जीव वाचला; मात्र ते सुमारे ८० टक्के भाजले असून त्यांची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यावर **पान ४ वर**

## भोंदूबाबा अशोक खरातला १२ मे पर्यंत न्यायालयीन कोठडी

नाशिक:महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या भोंदू अशोक खरात प्रकरणात आज न्यायालयात महत्त्वाची घडामोड घडली. महिला अत्याचाराच्या आठव्या गुन्ह्यात तपास यंत्रणेकडून पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली होती; मात्र आरोपीच्या वकिलांनी केलेल्या प्रभावी युक्तिवादामुळे न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावत खरातला १२ मेपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.

आज अशोक खरातला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी तपासी अधिकारी आणि सरकारी वकील ड. शैलेंद्र बागडे यांनी तीन दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, खरातच्या कार्यालयातील झाडाझडतीत काळा दगड आणि इतर संशयास्पद वस्तू मिळाल्या असून, महिलांवर अत्याचार करताना तो काहीतरी मंत्रोच्चार करत असल्याचा **पान ४ वर**

## ठाकरेंच्या शिवसेनेला अखेर काँग्रेसचा पाठिंबा

मुंबई/प्रतिनिधी-विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या तणावानंतर अखेर ठाकरेंच्या शिवसेनेला काँग्रेसचा पाठिंबा मिळाला आहे. शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी विधानपरिषद निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतल्यानंतर अंबादास दानवे यांची उमेदवारी जाहीर केली होती. या निर्णयावरून काँग्रेसमध्ये नाराजीची चर्चा रंगली होती.



काँग्रेसकडून स्वतंत्र उमेदवार देण्याच्या हालचाली सुरू असल्याचे संकेत मिळत असतानाच दोन्ही पक्षांमध्ये तब्बल दोन ते तीन तासांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीनंतर अखेर काँग्रेसने ठाकरेंच्या शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे महाविकास आघाडीतील तणाव निवळल्याचे स्पष्ट झाले. बैठकीनंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, आमचा लढा भाजपविरोधात आहे. महाविकास आघाडी म्हणून आम्ही एकत्र आहोत आणि पुढेही एकत्र राहणार आहोत. उद्धव ठाकरे यांनी घेतलेला निर्णय आम्ही मान्य केला असून अंबादास दानवे यांच्या उमेदवारीला काँग्रेसचा पूर्ण पाठिंबा आहे. या बैठकीला खा.सुप्रिया सुळे, खा.अनिल देसाई, आ.अनिल परब, आ.सतेज पाटील आणि आ. मिलिंद नार्वेकर उपस्थित होते. दरम्यान, शरद पवार राज्यसभेत गेल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी विधानपरिषदेत जावे, अशी काँग्रेसची अपेक्षा होती. मात्र, त्यांनी निवडणूक न लढण्याचा **पान ४ वर**

## पवार विरुद्ध पवार होऊ देणार नाही-खा.सुप्रिया सुळे

बारामती:बारामती असो की कुठेही यापुढे पवार विरुध्द पवार असा सामना होवू देणार नाही अशी ठाम भूमीका राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा.सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.

बारामती पोटनिवडणुकीनंतर २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा पवार विरुद्ध पवार सामना होणार का, याबाबत सुरू असलेल्या चर्चांवर खा.सुप्रिया सुळे यांनी ठाम भूमिका मांडत स्पष्ट शब्दांत विरोध दर्शवला आहे. मी कधीही पवार विरुद्ध पवार होऊ देणार नाही, असे सांगत त्यांनी राजकीय चर्चांना काहीअंशी पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. २०२९ मध्ये काय होईल, आघाड्या कशा असतील हे आताच सांगणे शक्य नाही. मात्र, कोणत्याही परिस्थितीत पवार कुटुंबात थेट राजकीय लढत होऊ नये, हीच आपली भूमिका राहील. वेळ पडली तर वेगळा निर्णय घेऊ, पण पवार विरुद्ध पवार लढत होऊ देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

## शेतात गांजाची लागवड करणाऱ्या आरोपीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-धर्माबाद तालुक्यातील करखेली शिवारात शेतात गांजाची लागवड करणाऱ्या एका आरोपीस पोलीसांनी बुधवारी अटक केली असून ७ किलो गांजाची झाडे जप्त करण्यात आली आहेत.



करखेली शिवारातील एका शेतात शेतकऱ्याने गांजाची झाडे लावल्याची माहिती धर्माबाद पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक सदाशिव भडीकर, फौजदार माधव लोणेकर यांच्यासह पोलीस कर्मचारी यांनी पंचासमक्ष बुधवारी दुपारी मौजे करखेली शिवारातील गट क्र.२६६ मधील निशांत पंडीत कदम यांच्या मालकीच्या शेतामध्ये छापा टाकला. सदरील शेतामध्ये गांजाची हिरवी ओलसर झाडे पोलीसांना आढळून आली. पोलीसांनी १ लाख ४३ हजार रुपये किंमतीचे ७ किलो गांजाची झाडे पंचासमक्ष जप्त केली आहेत. याप्रकरणी धर्माबाद पोलीस ठाण्यात निशांत कदम याच्या विरुध्द एनडीपीसी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीसांनी त्यास अटक केली आहे.

## चार मुलांच्या मृत्यू प्रकरणी महापालिकेच्या दोन अभियंत्यांचा आरोपीत समावेश

नांदेड/प्रतिनिधी-देगलूरनाका भागातील ईस्लामपूरा परिसरात विकासासाठी खोदुन ठेवलेल्या खड्ड्यात पाणी साचले होते. या पाण्यात पोहण्यासाठी गेलेल्या चार मुलांचा मृत्यू झाल्याची घटना दि.१६ एप्रिल रोजी घडली होती. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्ह्यात महापालिकेच्या उपअभियंता व कनिष्ठ अभियंता या दोघांचा आरोपी म्हणून समावेश करण्यात आला आहे.

ईस्लामपूरा भागात रस्त्याच्या कामासाठी कंत्राटदाराने मोठा खड्डा खोदुन ठेवला होता. या खड्डयात पाणी साचले होते. सुरक्षिततेच्या कारणावरुन खड्डयाच्या आवतीभवती कंत्राटदाराने कोणतेही बॅरीकेटस लावले नव्हते. तसेच काही उपाययोजना केलेली नव्हती. दि.१६ एप्रिल रोजी शाळा सुटून घरी परत जात असतांना चार मुले या खड्डयात पोहण्यासाठी गेले होते. खड्डा खोल असल्याने चारही मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. महापालिकेच्या निष्काळजीपणामुळे चार मुलांचा मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला होता. मनपा प्रशासनाने चौकशी समिती नियुक्त करुन तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले होते. याप्रकरणी आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी मनपा बांधकाम विभागाच्या उपअभियंता शिवकन्या जायभाये व कनिष्ठ अभियंता किरण सूर्यवंशी यांना तडकाफडकी निलंबित केले. तसेच बांधकाम विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता टाकळीकर, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता प्रकाश कांबळे यांच्यासह अन्य दोघांना कारणे दाखवा नोटीस बजावली. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यातही गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात संबंधीत कंत्राटदार व खाजगी प्लॉट मालक यांचा समावेश होता. चार बालकांच्या मृत्यूची गंभीर दखल राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने घेवून जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. या प्रकरणातील गुन्ह्यात उपअभियंता शिवकन्या जायभाये व कनिष्ठ अभियंता किरण सूर्यवंशी यांची नावे समाविष्ट करण्यात आली. सदर प्रकरणात कंत्राटदाराला पाठीशी घालण्याचा प्रयत्न महापालिका प्रशासनाकडून केला जात होता. प्रशासनावर जोरदार टीका होवू लागल्यानंतर कंत्राटदाराचे नाव आरोपी म्हणून करण्याचे पत्र उशिरा मनपा प्रशासनाने इतवारा पोलीस स्टेशनला दिले होते.

## ओबीसींच्या सर्वसमावेशक विकासावर शासनाचा भर-ना.अतुल सावे

### नांदेडमध्ये 'कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळावा' उत्साहात

नांदेड/प्रतिनिधी-इतर मागास वर्गाच्या (ओबीसी) आणि बहुजन समाजाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. 'ओबीसींचा सर्वसमावेशक विकास करण्यावर शासनाचा विशेष भर' असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन विकास, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

डॉ.शंकरराव चव्हाण सभागृहात इतर बहुजन कल्याण विभागाच्यावतीने आयोजित 'कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्यात' पालकमंत्री सावे अध्यक्षीय पदावरून बोलत होते. या कार्यक्रमास खा.अशोक चव्हाण, खा.डॉ. अजित गोपछडे, आ.राजेश पवार, आ.बाबुराव कोहळीकर, महापौर कविता मुळे, जि.प.च्या सीईओ मेघना कावली, सोनाली मुळे, डॉ. वसंत माने, मिलींद नारिंगे, प्रताप पवार, प्रशांत वावगे, तेजस माळवदकर, सचिन खुने यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना इतर मागास बहूजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे म्हणाले की, समाजातील तळागाळातील घटकांना आणि विशेषतः ओबीसी प्रवर्गातील तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे. महामंडळांच्या माध्यमातून सुलभ कर्ज उपलब्ध करून देणे आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे हे शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आजच्या या कर्ज वाटप मेळाव्याचा लाभ घेऊन तरुणांनी स्वतःचा व्यवसाय उभा करावा आणि राज्याच्या विकासात आपले योगदान द्यावे. रोजगार मिळविण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा, असे आवाहन मंत्री सावे यांनी केले. वर्षभरात ७५ विद्यार्थ्यांना जवळपास ६० लक्ष रुपयांपर्यत परदेशी शिष्यवृत्ती देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राज्यात ६२ जिल्हानिहाय वसतीगृहे उभारले आहेत. यात केवळ मुंबई-पुणे शहरे अपवाद आहेत. या ६२ वसतीगृहामध्ये ३१ मुलीसाठी आणि ३१ मुलांचे वसतीगृहे आहेत. याशिवाय आधार योजनेच्या माध्यमातूनही ओबीसी विद्यार्थ्यांना राहण्याची सोय शासनाकडून करण्यात येत आहेत. असे पालकमंत्री ना.अतुल सावे यांनी सांगितले.



या ऐतिहासिक कार्यक्रमात मार्गदर्शन करताना खा.अशोक चव्हाण म्हणाले, वाढत्या स्पर्धेच्या काळात रोजगार आणि व्यावसायिक गुणवत्तेची गरज अधोरेखित झाली असून, 'विकसित भारत २०४७' चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, असे खा.चव्हाण म्हणाले. या कार्यक्रमात लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज कसे भरावेत याबाबतची **पान ४ वर**

## बंगाल ते आसाम: सत्तासंग्रामाचा निर्णायक टप्पा

देशातील पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम आणि पद्दुचेरी या पाच राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुकांचा अंतिम टप्पा पार पडला असून मतदानानंतर विविध अंदाज समोर येऊ लागले आहेत. यापैकी पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आणि आसाम या चार महत्त्वाच्या राज्यातील निवडणुकांकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते, कारण या राज्यांतील निकाल केवळ स्थानिक सत्तांतरापुरते मर्यादित नसून देशाच्या राजकीय प्रवाहावर परिणाम करणारे ठरणार आहेत.या निवडणुकांचे वैशिष्ट्य असे की, बहुतेक ठिकाणी केंद्रात सत्तारूढ असलेल्या भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या विरोधातील प्रादेशिक पक्ष यांच्यात थेट संघर्ष दिसून आला. विशेषतः पश्चिम बंगालमध्ये हा संघर्ष अधिक तीव्र झाला. गेल्या काही वर्षांपासून भाजपने येथे आपले बळ वाढवण्याचा सातत्याने प्रयत्न केला असून, सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांना सत्तेतून दूर करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. भाजपचे वरिष्ठ नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यात तळ ठोकून व्यापक प्रचार केला, तर ममता बॅनर्जी यांनी बंगालच्या अस्मितेचा मुद्दा पुढे करत मतदारांना एकत्र ठेवण्याचा प्रयत्न केला. आसाम मध्येही सत्तासंघर्ष चुरशीचा ठरला. येथे सत्ताधारी भाजपने पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली, तर काँग्रेस आणि प्रादेशिक पक्षांनी एकत्र येत त्यांना कडवे आव्हान दिले. विकासाबरोबरच ओळख, स्थलांतर आणि स्थानिक प्रश्न या मुद्द्यांवर निवडणूक रंगली. त्यामुळे आसाममधील निकाल ईशान्य भारतातील राजकीय समीकरणांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. केरळमध्ये पारंपरिकरित्या डावे आघाडी आणि काँग्रेस-नेतृत्वाखालील आघाडी यांच्यात सत्तांतर होत आले आहे. मात्र यावेळी डाव्या आघाडीने सलग सत्ता टिकवण्याचा दावा केला, तर काँग्रेसने पुनरागमनासाठी जोरदार प्रयत्न केले. भाजपने येथे आपले अस्तित्व वाढवण्याचा प्रयत्न केला असला तरी मुख्य लढत पारंपरिक आघाड्यांमध्येच केंद्रित राहिली.तामिळनाडूमध्ये द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांच्यातील स्पर्धा कायम राहिली. स्थानिक नेतृत्व, भाषा आणि प्रादेशिक अस्मिता या मुद्द्यांवर निवडणूक रंगली. भाजपने अण्णाद्रमुकसोबत युती करत आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न केला. मतदानानंतर जाहीर होणारे अंदाज हे केवळ प्राथमिक संकेत देणारे असतात; अंतिम चित्र मतमोजणीनंतरच स्पष्ट होणार आहे. तरीही या अंदाजांमुळे राजकीय वातावरणात उत्सुकता वाढली असून विविध स्तरांवर चर्चा सुरू आहे. या निवडणुकांचे निकाल हे केवळ चार राज्यांपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर ते देशातील राजकीय प्रवाहाची दिशा ठरवणारे ठरू शकतात. विशेषतः पश्चिम बंगाल आणि आसाममधील निकाल भारतीय जनता पक्षाच्या विस्तारासाठी तसेच विरोधकांच्या एकजुटीसाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. प्रादेशिक पक्षांनी सत्ता टिकवली, तर त्यांच्या बळकटीचा संदेश देशभर जाईल; अन्यथा केंद्रातील सत्ताधारी पक्षाची पकड अधिक दृढ झाल्याचे चित्र निर्माण होईल.एकूणच, या निवडणुका भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या आहेत. मतदारांनी दिलेला कौल हा केवळ सत्तांतराचा निर्णय नसून देशाच्या राजकीय भवितव्याचा दिशादर्शक ठरेल. आता सर्वांचे लक्ष अंतिम निकालांकडे लागले असून, पुढील काही दिवसांत देशाचे राजकीय चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.

# शिवप्रेमी प्रशांत आंबी याचा जीवनप्रवास शिक्षकाच्या व चळवळीच्या नजरेतून





**गिरीश फोंडे**
कोल्हापूर

(मागील अंकावरुन)

द्यायचा असेल तर पुस्तक विक्री करावी आणि त्यासाठी सोशल मीडियाचा आधार आणि नवीन नवीन कल्पनांचा आधार घ्यावा असे हे या दोन-तीन वर्षांमध्ये एक पद्धत विकसित केली. बिंदू चौकातील कोल्हापूर मधील ऑफिस हे पुरोगामी चळवळीतील उपक्रमशील व वैचारिक मेजवानीचा तळ होता. येथे महाराष्ट्रातील अनेक मान्यवर विचारवंत भेट द्यायचे, या सगळ्यांची भेट प्रशांतची व ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशनच्या सर्व कार्यकर्त्यांची व्हायची. गोविंद पानसरे यांच्याबरोबर देखील खेळीमेळीच्या वातावरणात हे सर्व ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशनचे कार्यकर्ते असायचे आणि हे खेळीमेळीचे मैत्रीपूर्ण वातावरण गोविंद पानसरे यांच्यामुळेच तयार व्हायचे. इतर वयाने वरिष्ठ कार्यकर्ते हे तरुणांच्या वरती खेकसायचे मात्र गोविंद पानसरे या सर्व गोष्टी व्यवस्थितपणे हाताळायचे.

ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशनचे सर्व कार्यकर्ते व प्रशांत यांच्या चळवळीतील वाटचालीबद्दल व कौटुंबिक परिस्थितीबद्दल देखील पानसरे माझ्याशी चर्चा करायचे व एकत्रितपणे त्यावरती सोल्युशन काढायचे. असा हा गोविंद पानसरे-मी -प्रशांत, धीरज, हरीश, आरती या चळवळीतील तीन पिढ्यांचा समतोल तयार झाला. प्रशांतने चळवळीतील अनोपचारिक शिक्षणावरती जास्त विश्वास ठेवला, या सगळ्या घटनाक्रमामध्ये त्याचे कॉलेजचे औपचारिक शिक्षणमध्येच सुटले. तो पुढे ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशनचा राज्य सेक्रेटरी झाला. त्यांने बांधकाम कामगारांसाठी चळवळ उभी केली. पण तो चळवळ शिकत राहिला, ऐकत राहिला, बोलत राहिला व पुस्तक रूपाने छापत राहिला. गोविंद पानसरे नेहमी म्हणत की कार्यकर्त्यांना त्यांच्या आवडीचे जे काही करायचे ते करू द्यावे. गोविंद पानसरे हे देखील महानगरपालिकेकडे शिक्षक होते, त्यामुळे विद्यार्थी व युवकांचे मन समजून घेऊन त्या कलेने कसे हाताळावे हे त्यांना समजत होते. कार्यकर्त्यांना आवडीचेच काम करू द्यावे याबद्दल माझी मात्र वेगळी मते होती. आता थोडाफार बदल यामध्ये झाला आहेच. या सर्व गोष्टी चर्चा करण्याचा हेतू पुरोगामी चळवळीतील लोकांचा प्रवेश ही एक चिंताजनक बाब बनत चालली आहे. अशा परिस्थितीत माझ्या पिढीतले युवक व प्रशांत, धीरज, हरीशच्या पिढीतील युवक चळवळीकडे कसे आकर्षित झाले व टिकले हे समजून घेतल्यास येणाऱ्या काळामध्ये ही प्रक्रिया गतिमान करण्यासाठी उपयुक्त होईल. पुढे गोविंद पानसरे यांचा खून झाला. हा सर्व कार्यकर्त्यांसाठी कसोटीचा काळ होता. कोल्हापुरातील बिंदू चौक ऑफिसमधील या चळवळीत दोन गट पडले. यावेळी देखील प्रशांतने माझ्याबरोबर राहणे पसंत केले. मला नंतर सोशलमीडियामध्ये तुझाही पानसरे-दाभोळकर करू अशी धमकी आली. आम्ही या विरोधात आंदोलन सुरू केल्यानंतर चळवळीतील काहींनी मलाच ट्रोल करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी देखील प्रशांत, धीरज, हरीश, आरती माझ्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले. त्याचे मित्र गंमतीने त्याला तू फोंडे सरांचा अंधभक्त आहेस! अशी टीका करतात. पण तो माझ्याही भूमिकांची समीक्षा करत असतो, त्यावर तो टिपणी करत असतो, काही सूचना करत असतो, ज्याचा मला उपयोग होतो. ५ एप्रिल २०२५ शक्तीपीठ महामार्गाच्या आंदोलनावेळी उपमुख्यमंत्र्यांच्या विरोधात वक्तव्य केले म्हणून मला नोकरीतून निलंबित करण्यात आले, त्यावेळी देखील माझ्यासोबत खंबीरपणे प्रशांत व त्याचे साथीदार उभे राहीले. प्रशांतने हळूहळू स्वतः देखील लिहायला सुरू केले. सोशल मीडिया व त्या संबंधाच्या नवीन नवीन व्यावसायिक कौशल्य आधारित गोष्टींना सुरुवात केली. त्याकरता त्यांना पैसे कमी पडले. धीरजला देखील छोटा व्यवसाय सुरू करायचा होता. पण मार्गदर्शन व सल्ले याव्यतिरिक्त कोणतीच आर्थिक मदत मी करू शकलो नाही. याबद्दल सदैव माझ्या मनात खंत राहीली. अजूनही प्रशांत व धीरज यांचा या छोट्या व्यवसायाचा काळ संघर्षाचाच आहे. त्यामध्ये ते यशस्वी होतील एवढी शिक्षक म्हणून आशा वाटते. या मागील दहा-पंधरा वर्षांमध्ये सातत्याने त्यांचे मन व कार्यपद्धती समजून घेण्याचा प्रयत्न केला, त्यामध्ये कधी यशस्वी झालो तर कधी अपयशी. याचा युवक विद्यार्थी चळवळीमध्ये संघटनासाठी उपयोग झाला. त्यांचे सोशलमीडिया मधील ज्ञान व कौशल्य हे आमच्या पुढे आहे ते देखील समजून घेण्याचा व आत्मसात करण्याचा प्रयत्न केला.

आमच्यातील चळवळीच्या छोट्या-छोट्या मतभेदांमध्ये प्रशांत, धीरज, आरती यांनी नमते घेऊन नेहमी सहकार्याची भूमिका निभावली. पुस्तकांचा सहवास, विक्री, छपाई यामध्ये त्यांनी जास्त भर न देता त्यांनी संघटन, जनआंदोलन याची कौशल्ये आत्मसात करण्याचा माझा आग्रह राहिला. मी त्यांना चळवळ करता करता कुठेतरी नोकरी करण्याचा सल्ला दिला. पण त्यांना स्वातंत्र्य, स्वाभिमान प्रिय होते, नोकरी करण्याचा पिंड प्रशांतचा नाही. पण नम्रपणे ते आपल्या वाटचालीवर कायम राहिले व सातत्य टिकवले. आजवर शिवाजी कोण होता? व इतर परिवर्तनवादी चळवळीतील हजारो पुस्तके त्यांनी महाराष्ट्रात आणि भारतामध्ये लोकांपर्यंत माफक दरात पोहचवली आहेत. मला वाटते हे देखील चळवळीचेच काम आहे, ती भूमिका त्यांनी निभावली आहे. त्याबद्दल त्यांचा अभिमानच वाटायला हवा. २२ एप्रिल रोजी जेव्हा आमदार संजय गायकवाड त्यांना फोन करून अर्वाच्य भाषेमध्ये धमकी देतो, शिवाजी महाराजांच्या बद्दल अपशब्द वापरतो. पानसरेंच्या बद्दल अपशब्द वापरतो, तेव्हा देखील संयमाने तोल न ढळू देता प्रशांतने सेल्फ मेड संतुलित व्यक्तिमत्व असल्याचे दाखवून दिले आहे. मी प्रशांतच्या ठिकाणी असतो तर कदाचित वेगळी प्रतिक्रिया दिली असती. पण मी मी आहे आणि प्रशांत प्रशांत आहे. प्रशांतने संयमाने उत्तरे देऊन महाराष्ट्रातील अनेक लोकांची मने जिंकली आहेत. प्रत्येकाने स्वतः जे आहोत तेच राहिले पाहिजे हा यातून बोध घेतला पाहिजे. प्रशांत नेहमी मित्रांच्या मदतीला धावून जातो. मैत्री जोडतो, मैत्री टिकवतो. मला वैयक्तिक मैत्रीकडे मात्र जास्त लक्ष देता आले नाही. प्रशांतचा हा चांगुलपणा आमच्यात ही येवो.


प्रशांतने आपले छोटेखानी बोद नावाचे आत्मचरित्र लिहिले, त्याचे देखील अनेकांनी कौतुक केले. हे पुस्तक त्याने मला समर्पित केले आहे. पण सुरुवातीला मला देखील माझ्या व्यस्ततेमुळे वाचायला शक्य झाले नाही, त्याचवेळी बोदच्या वाटचालीबद्दल लिहायचे होते. पण आता धमकीनंतरच्या संघर्षाच्या प्रसंगामध्ये लिहिणे होत आहे. या मनोगतातून प्रशांत, धीरज, आरती, हरीश यांच्यासारख्या युवकांना समजून घेण्यास व पुरोगामी चळवळीमध्ये युवकांचा प्रवेश सुलभ करण्यास यामुळे काहीतरी मदत होईल अशी अपेक्षा वाटते. लिहिण्यासारखे बरेच काही आहे भविष्यात संधी मिळाल्यानंतर लिहीनच. आपण सर्वतोपरी लागेल ती मदत भविष्यात प्रशांतला व अशा महाराष्ट्रातील तमाम युवक युवतींना केली पाहिजे असे कळकळीने वाटते. त्याचा येणाऱ्या काही महिन्यात अत्यल्प दरामध्ये शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या दहा लाख प्रती विकण्याचा संकल्प आहे. याकरिता आम्ही सर्वजण आर्थिक मदत त्याला करणार आहोत, जनतेने देखील मदत करावी अशी अपेक्षा आहे.

समाजात मनुवादी विचार प्रस्थापित करण्यासाठी ब्राह्मण्यवादी धर्मांध शक्ती जुलूम जबरदस्ती वाढवतात तेव्हा प्रशांत आंबी सारख्या तरुणांचा उदय हा नैसर्गिकपणे होतो, परिस्थिती ती जन्माला घालते. प्रशांतचा वयाच्या सहाव्या वर्षापासूनचा जीवन प्रवास त्याचे कुटुंबीय व नातेवाईक, बालपणीचे मित्र यांच्याबरोबरच मी शिक्षक म्हणून पाहिलेला आहे. उपक्रमशील, सातत्याने प्रयोग करत राहण्याची जिद्द, आपल्या विचारांवर निष्ठा आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या मर्यादेमध्ये वर्तन, थोरामोठ्यांचा आदर या सर्व गोष्टी प्रशांतला इतर विद्यार्थ्यांच्या पेक्षा वेगळ्या बनवतात. प्रशांत आज जो काही आहे त्याचे सर्व श्रेय त्याच्या आई वडिलांना, बहिणींना जाते. त्याची जीवनसाथी आरती पुरोगामी विचारांची कार्यकर्ती आहे. ऑल इंडिया युथ फेडरेशनची राज्य अध्यक्ष आहे. आपले भाचे सुनील व श्रीकांत हे देखील त्याने चळवळीत आणले आहेत. प्रशांत असो किंवा अन्य कोणताही पुरोगामी चळवळीतील युवक-युवती, त्यांच्यामागे सर्वप्रथम कशाचाही विचार न करता ठामपणे उभे राहिले पाहिजे. ही काळाची गरज आहे. हे सर्व युवक तुफानातील दिवे आहेत. यांनाच प्रगतिशील वारसा पुढे चालवायचा आहे. प्रशांत व युवकांच्या या प्रतिगामी विचारांच्या विरोधातील लढ्यामध्ये आपण सर्वांनी त्यांच्यासोबत तन-मन-धनाने खंबीरपणे उभा राहण्याचे एक शिक्षक म्हणून मी आवाहन करत आहे. चळवळीतील आम्ही शिक्षक असो की आमचे विद्यार्थी संघर्ष आमच्या पाचवीला पुजला आहे. एका वारंवार निलंबित होणाऱ्या शिक्षकाच्या चळवळीतील विद्यार्थ्यांना जीवे मारण्याच्या धमक्या, मुस्कटदाबीच्या धमक्या येणे नैसर्गिक आहे.

*समाप्त*

# एकाच घरातून तिहेरी यशाचा जल्लोष; एमपीएससी, नीटमध्ये सरतापे भावंडांची किमया







किनवट/प्रतिनिधी- सरस्वती अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य आनंद सरतापे परिवारातील सुमेध सरतापेंनी स्पर्धा परीक्षेत दुहेरी यश संपादन केले. कु.श्वेता सरतापे कृषी सहायक अधिकारी आणि कु.अंकिता सरतापेंनी नीट परिक्षेत यश मिळवून एमबीबीएससाठी गरुडझेप घेतलीय. मुलांनी उच्चशिक्षित व्हावे यासाठी सरतापे परिवाराने केलेल्या प्रयत्नाला मुलांनी यशाची गवसणी घालून प्रत्यक्षात साकारल्या बद्दल अभिनंदनाचा वर्षाव होतांना दिसतो.

सुमेध आनंद सरतापेंनी स्पर्धा परीक्षेत दुहेरी यश संपादन केले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अनुसूचित जाती प्रवर्गात महाराष्ट्रातून अव्वल स्थान मिळवून सहाय्यक कर अधिकारी या पदावर गरुड झेप घेतली. यापूर्वी स्पर्धा परीक्षेत यश मिळवून पोलीस महासंचालक कार्यालय परिक्षेत्र नांदेड येथे महसुली लिपिक म्हणून नियुक्ती झाली होती. तर त्याच बरोबर श्वेता आनंद सरतापे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत यशस्वी होऊन कृषी सहाय्यक अधिकारी म्हणून नागपूर विभागात नियुक्ती झालीय. प्रा.सरतापेंची लहान मुलगी कु.अंकिता सरतापेंनी नीट परीक्षेत यश मिळवत नंदुरबार येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएससाठी प्रवेश मिळविला हे विशेष.

यशोशिखर गाठणाऱ्या गुणवंतांचे पालक प्राचार्य आनंद सरतापे व सौ.मनीषा आनंद सरतापे यांचे आ.भीमराव केराम, सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेमानिवार, सचिव व मुख्याध्यापक कृष्णकुमार नेमानीवार, सौ.अनुजा पाटील, संस्थेचे सर्व सदस्य, इंजी.प्रशांत ठमके, मुख्याध्यापिका शुभांगी ठमके, ऍड.के.के.साबळे, प्राचार्य डॉ.आनंद भंडारे, प्राचार्य किरण पाईकराव, प्राचार्य डॉ.आनंद भालेराव, प्रो.डॉ.मार्तंड कुलकर्णी, डॉ.सुनील व्यवहारे, डॉ.द्वारकाप्रसाद वायाळ, उपप्राचार्य डॉ.पंजाब शेरे, मुख्याध्यापक अनिल कांबळे हिंगोली, कृषी अधिकारी विनोद कदम, मामा अमोल बर्डे, गौतम चौदंते, काका श्रावण सरतापे तसेच सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विविध स्तरातील मान्यवरांनी, नातेवाईकांनी या परिवाराचे अभिनंदन केले आहे.

# बारा ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत बबन चोपडे विजयी

उमरखेड/प्रतिनिधी- उमरखेड तालूक्यातील बारा ग्रामपंचायतमध्ये एका जागेसाठी झालेल्या पोटनिवडणूकीत, ग्रामविकास पॅनलचे बबन चोपडे यांचा १०५ मताने दणदणीत विजयी झाल्याने, गावकऱ्यांनी पुन्हा एकदा ग्रामविकासावर शिक्का मोर्तब केल्याचे, यानिमित्ताने पुढे आले आहे.

२८ एप्रिल रोजी बारा ग्रामपंचायत मध्ये एका जागेची पोटनिवडणूक प्रक्रिया पार पडली. एका जागेसाठी झालेल्या निवडणुकीत २८३ मतदान झाले होते. यामध्ये बबन चोपडे यांना १९३ मते मिळाली तर स्व रामराव पाटील नरवाडे यांच्या पत्नी रत्नमाला रामराव नरवाडे यांना ८८ मतदान मिळाले. बबन चोपडे यांच्या विजयामुळे पुन्हा एकदा त्यांच्या ग्रामविकास पॅनलचे वर्चस्व सिद्ध झाले आहे. त्यांच्या या विजयात ग्रामविकास पॅनलचे लक्ष्मणराव उखळे, गंगाधरराव चोपडे, साहेबराव नरवाडे, गजानन दत्तराव चोपडे, सोनबा आनंदराव सुरोशे, संभाजीराव सुरोशे, दत्तराव नरवाडे, प्रकाशराव नरवाडे, काळुराम नरवाडे, दिगांबर अन्साजी सुरोशे, गोविंदराव उखळे, गणेशराव उखळे, संजय बळीराम उखळे, गोविंदराव नरवाडे, साहेबराव भालेराव, देवराव पाटील सुर्यवंशी, एकनाथराव देवसरकर, एकनाथ वांगे, पार्वतीबाई सुधाकरराव काळे, बालूबाई सुर्यवंशी, साहेबराव चोपडे, मिराबाई नरवाडे, चंदाबाई चोपडे, शेषराव नरवाडे, अंन्साजी देवसरकर, अनिल पाटील सोळंके नांदेडकर, अनिल चोपडे, स्वप्निल चोपडे यांनी अथक परिश्रम घेतले. घरकुल योजनेचा बोऱ्या, नळ योजना बंद, जागोजागी खोदून ठेवलेले रस्ते यामुळेच लोकांमध्ये नाराजी वाढत गेल्याने, विरोधी पॅनलची दाणादाण उडाल्याचे गावात बोलल्या जात आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# ग्रंथपाल-शारीरिक शिक्षण संचालक भरतीत दुजाभाव?

## २०१७ च्या निकषांवर नियुक्तीमुळे उमेदवारांमध्ये नाराजी

नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रात सहाय्यक प्राध्यापकांच्या मोठ्या प्रमाणातील भरतीला हिरवा कँदील मिळाल्यानंतर आता ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक या पदांच्या भरती धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शासनाने दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांची ५०१२ रिक्त पदे भरण्यास मंजुरी दिली आहे.

या भरतीसाठी दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येचा आधार घेतला गेला आहे. मात्र, याच वेळी ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक या पदांच्या भरतीसाठी दि. १ ऑक्टोबर २०१७ च्या विद्यार्थी संख्येचा निकष लावण्यात आल्याने मोठा विरोध व्यक्त होत आहे.या निर्णयामुळे संबंधित पदांची संख्या अत्यल्प राहणार असून, अनेक पात्र उमेदवारांना संधीपासून वंचित राहावे लागणार आहे. विशेष म्हणजे, ही दोन्ही पदे आधीच मर्यादित स्वरूपाची (एकाकी) असल्याने २०१७ च्या निकषांवर आधारित भरती हा अन्यायकारक निर्णय असल्याचे मत उमेदवारांकडून व्यक्त होत आहे.शैक्षणिक तज्ज्ञांच्या मते, महाविद्यालयीन शिक्षणात ग्रंथालय हे ज्ञानाचे केंद्र असून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. तसेच, शारीरिक शिक्षण संचालक विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. अशा परिस्थितीत या पदांकडे दुय्यम दृष्टिकोनातून पाहणे योग्य नसल्याची टीका होत आहे. दरम्यान, शासनाने या दोन्ही पदांच्या भरतीला अखेर मंजुरी दिली असली तरी ती २०१७ च्या निकषांवर आधारित असल्याने अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतरही उमेदवारांना न्याय मिळालेला नाही, अशी भावना व्यक्त होत आहे.दरम्यान, पात्र उमेदवारांनी शासनाकडे मागणी केली आहे की, ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक या पदांची भरतीही सहाय्यक प्राध्यापकांप्रमाणेच दि.१ ऑक्टोबर २०२५ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारे करण्यात यावी.शासनाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून भेदभावपूर्ण धोरण टाळावे आणि सर्व पदांसाठी समान निकष लागू करावेत, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.

# बुद्ध जयंतीनिमित्त सुधाकर पांढरे मित्र मंडळातर्फे शुक्रवारी अन्नदान

नांदेड/प्रतिनिधी-तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त नांदेड शहराचे प्रथम महापौर सुधाकर पांढरे मित्र मंडळातर्फे शुक्रवार दि.१ मे रोजी सायंकाळी ७ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर अन्नदान व खिरदार वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

बुद्ध जयंतीनिमित्त सुधाकर पांढरे मित्र मंडळाचे अध्यक्ष राहुल वाघमारे व त्यांच्या सहकाऱ्यांच्यावतीने गेल्या पंधरा वर्षांपासून अन्नदान व खिरदान हा सामाजिक उपक्रम सतत राबविला जात आहे. यंदाही बुद्ध जयंतीनिमित्त अन्नदान व खिरदान वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाइंचे राज्य संघटक विजय सोनवणे हे राहणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, प्रथम महापौर सुधाकर पांढरे, कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष सुखदेव चिखलीकर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कृष्णा देशमुख, तहसीलदार विनोद गुंडमवार, कार्यकारी अभियंता सागर तायडे, प्रफुल्ल सावंत, सुरेश दंडवते, ॲड.मिलिंद लाठकर, सुभाष काटकांबळे, ॲड.अमित डोईफोडे, स.दिपसिंघ गाडीवाले, उद्योजक मनिष अग्रवाल, अनिल पाटील बोरगावकर, पत्रकार अविनाश पाटील, महेश चालिकवार, ॲड.नितीन कागणे, रविंद्रसिंघ जंगी, नंदकुमार बनसोडे, काजी नाफे यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक व सुधाकर पांढरे मित्रमंडळाचे अध्यक्ष राहुल वाघमारे यांनी केले आहे.



नांदेड शहरातील श्यामनगर भागात रस्त्यावरील कचरा वाहनात जमा न करता कंत्राटी सफाई कर्मचारी हे खाजगी इमारतीचे बांधकाम पाडलेले साहित्य वाहनात टाकुन घेवून जातांना दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# नांदेड जिल्ह्यात तीव्र चलन टंचाई; खा.अशोकराव चव्हाणांचे रिझर्व्ह बँकेला तातडीचे पत्र

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील तीव्र चलन टंचाईबाबत माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्रादेशिक संचालकांना पत्र लिहून पुरेसे चलन तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. जिल्ह्यात सध्या लग्नसराईचा हंगाम आणि शेतकऱ्यांची पेरणीपूर्व लगबग सुरू असतानाच चलनाची मोठी टंचाई निर्माण झाली असून, खा. अशोकराव चव्हाण यांनी या गंभीर परिस्थितीबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे.



आपल्या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, नांदेड जिल्ह्यासाठी मुख्य 'करन्सी चेस्ट' म्हणून काम करणाऱ्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शिवाजीनगर शाखेतील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. या चेस्टची मर्यादा कोटी रुपये असताना सध्या तिथे केवळ मर्यादित रक्कम उपलब्ध आहे. जिल्ह्याची दैनंदिन गरज पाहता उपलब्ध निधी जेमतेम दोन दिवस पुरू शकेल अशी स्थिती आहे. चलनाचा पुरवठा कमी असल्याने याचा मोठा फटका लग्नकार्य असलेल्या कुटुंबांना आणि बियाणे-खते खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांना बसला आहे.ग्रामीण अर्थव्यवस्थेत रोख रकमेचे महत्त्व मोठे असून, सद्यस्थितीत डिजिटल व्यवहारांतही अनेक अडचणी आहेत. नांदेड करन्सी चेस्टकडून सातत्याने मागणी करूनही नागपूर विभागाकडून पुरेशी रोख रक्कम पुरवण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर, रिझर्व्ह बँकेने या समस्येची तातडीने दखल घेऊन जिल्ह्याची पुढील सात दिवसांची गरज पूर्ण करण्यासाठी किमान २०० कोटी रुपये उपलब्ध करून द्यावेत, असेही खा. अशोकराव चव्हाण यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

# भीम जयंती उत्सव शिल आणि चरित्र्य संपन्न नागरिक घडवणारी लोकचळवळ आहे-प्रवीण गायकवाड

मुदखेड/प्रतिनिधी-येथील पिंपळकौठा (चोर) या गावी विश्वभूषण, परंपूज्यनीय बोधिस्तव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

यावेळी तथागत भगवान गौतम बुद्ध,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैल चित्रास पुष्प व पुष्प माल्या अर्पण करून दीप व धूप प्रज्वलना नंतर पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण जेष्ठ उपासक प्रवीण गायकवाड यांच्या हस्ते संपन्न झाले व सामुदायिक त्रिसरण पंचशील ग्रहना नंतर कार्यक्रमाचे रूपांतर विचारसभेत करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलताना प्रवीण गायकवाड म्हणाले की, बाबासाहेब आंबेडकर हे काही दलित समाजापुरते मर्यादित नव्हते तर ते विश्ववंदनीय अस्टपैलू कर्ते सुधारक होते, कायदा,जल शिंचन, ऊर्जा, अर्थ, शिक्षण, समाजिक,राजकीय, धार्मिक सर्वच पातळीवर अचाट बुद्धिमत्ता असलेले व्यक्तिमत्व असलेले बाबासाहेब ज्ञानाचे प्रतीक म्हाणून जगाने मान्य केले आहे. तेंव्हा अस्या महामानवाचे अनुयायी म्हणून जयंती उत्सव साजरा करतांना समाज बांधवानी शिल आणि चारित्र्य संपन्न वर्तनाने आपली ओळख समाज मनात निर्माण करावी असे उपस्थितांना आवाहन करून, अलीकडच्या काळात भीम जयंती उत्सव हा नाच गाण्यापुरता संकुचित होतांना दिसत असल्या बाबत खेद व्यक्त करतांनाच असे सांगितले की,भीम जयंती उत्सव हा शिल आणि चारित्र्य संपन्न नागरिक निर्माण करण्याची लोक चळवळ आहे. यावेळी प्रिन्स हनमंते,प्रतीक्षा सूर्यवंशी,प्रतीक्षा हनमंते,प्रज्ञा विनोद हनमंते,प्रिया हनमंतेबाल वक्त्यांचे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक परमेश्वर भीमालवाड, नामदेव मालिपाटील यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकनारी समायोचित भाषणे झाली.

# राजेश्वर किशवे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

देगलूर/प्रतिनिधी-चैनपुर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे केंद्र समन्वयक राजेश्वर पंढरीनाथ किशवे हे सेवानिवृत्त झाले आहेत त्यानिमित्त त्यांचे गटशिक्षणाधिकारी कार्यालय व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी बालाजी शंकरराव गोडाजी हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी हमीदजी दौलताबादी, वीरभद्र चैनपुरे, वैजनाथ काळे केंद्र प्रमुख हे उपस्थित होते. राजेश्वर किशवे हे केंद्रप्रमुख या पदावर कार्यरत असतांना त्यांनी प्रामाणिकपणे व निष्ठेने सेवा केली आहे. त्यांच्या कामातील शिस्त आणि सहकार्याची असलेली भूमीका नेहमीच प्रेरणादायी आहे, असे मत उपस्थित मान्यंवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास राजेश्वर किशवे यांचे आई, वडील, पत्नी यांचा सर्व शिक्षकांच्या वतीने व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला परिसरातील शिक्षक, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# नांदेड जिल्हा परिषदेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा परिषदेत आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित या कार्यक्रमात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, नरेगा विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड यांच्यासह विविध विभागांचे खाते प्रमुख अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रियंका पोटेची टॅक्स असिस्टंट पदी निवड

लातूर/प्रतिनिधी-पीपल्स कॉलेजमधील अर्थशास्त्र व इंग्रजी विभागातील विद्यार्थीनी कु प्रियंका पोटे हिची जीएसटी कार्यालयात टॅक्स असिस्टंट म्हणून महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे निवड झाली आहे.



या निवडीबद्दल तिचा पीपल्स कॉलेजच्या वतीने प्राचार्य डॉ शिवशंकर भानेगांवकर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास सुकाळे, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य प्रा डॉ. यशपाल भिंगे यांनी सत्कार केला. याप्रसंगी ग्रंथपाल प्रा. संदीप गायकवाड, कार्यालयीन प्रमुख रोहिदास आडे, प्रा. मयुरी फुके, प्रा. योगिता अनमोड प्रियंका पोटे या विद्यार्थिनीच्या यशाबद्दल नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए (डॉ.) प्रवीण पाटील, उपाध्यक्ष प्रफुल अग्रवाल, सचिव प्रा. शामलताई पत्की, सहसचिव कॉ. प्रदीप नागपूरकर व प्राध्यापक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# दिग्गजांना धक्का:माहूर पोटनिवडणुकीत नवतरुणांचा बोलबाला

माहूर/प्रतिनिधी-तालुक्यातील चार सरपंच व १५ ग्रामपंचायत सदस्य पदांसाठी मंगळवारी पार पडलेल्या पोटनिवडणुकीचे निकाल बुधवारी (दि.२९) जाहीर झाले. तहसील कार्यालयात झालेल्या मतमोजणीत अनेक ठिकाणी प्रस्थापितांना धक्का बसला असून मतदारांनी नवतरुण उमेदवारांना पसंती दिल्याचे चित्र स्पष्ट झाले.

काही ठिकाणी बिनविरोध निवडी झाल्या तर काही ठिकाणी चुरशीच्या लढतीत नव्या चेहऱ्यांनी बाजी मारत गावपातळीवरील राजकारणात बदलाचे संकेत दिले. निकाल जाहीर होताच विविध गावांत विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी जल्लोष साजरा केला.

विजयी उमेदवार असे- हिंगणी: आमटे विध्या अजय (सरपंच), मनीषा लक्ष्मण वडणे (सदस्य-बिनविरोध), विलास दिगांबर वडणे (सदस्य). रुपा नाईक ताडा: शिवचरण बाबुसिंग राठोड (सरपंच), निखिल उत्तम चव्हाण, स्वप्नील विष्णू राठोड (सदस्य).गोकुळ नगर: विध्या दिलीप राठोड, दर्पण अशोक चव्हाण (सदस्य). वडसा: प्रशांत नागोराव श्रीरामेजवार (सदस्य-बिनविरोध). लांजी: अनुराधा संतोष कोपूलवार (सदस्य). ईवळेश्वर: मंगलसिंग साहेबराव जाधव (सदस्य). पाचोंदा: वनीता अनील किनाके, बाळु माणीक तोरकड (सदस्य). वसराम तांडा: सुरज विजय जाधव (सरपंच), रंजना पंजाब जाधव, उमेश उल्हास राठोड, रंजना युवराज चव्हाण, अतुल उल्हास जाधव (सदस्य). सतिगुडा: कोवे कमल देवेंद्र (सरपंच). दत्तमांजरी- संगीला शिवाजी जॉगदंडे (सदस्य-बिनविरोध). कुपटी: वर्षा मारोती खुडे (सदस्य-बिनविरोध). पवनाळा: निताबाई भारत राठोड (सदस्य-बिनविरोध). या निकालामुळे तालुक्यातील ग्रामराजकारणात नव्या नेतृत्वाचा उदय होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

# स्वारातीम विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती उत्साहात साजरी

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे गुरुवार, दि.३० एप्रिल रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, डॉ.शैलेश वाढेर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, डॉ. अनिकेत मुळे, केशव गवाळे, शिवराम लुटे, गोविंद हंबर्डे, शिवाजी चांदणे, शेख बशीर, सुधाकर शिंदे, संदीप एडके, नारायण गोरे, तुकाराम बारसे, दीपक हंबर्डे, बंकट ठाकूर, चंद्रकांत हंबर्डे, बबन हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# बालाजी चिंचबंनकर यांचे निधन

मुदखेड/प्रतिनिधी-मौजे राजवाडी येथील बालाजी कोंडीबा चिंचबंनकर (वय ७०) यांचे आज (गुरुवार) सकाळी दुःखद निधन झाले.



गोविंदराव कोंडीबा चिंचबणकर यांचे सरपंच आयोध्या बाई रंगराव गुंजकर यांचे मोठे बंधू होत होतं. त्यांच्या निधनामुळे राजवाडी गावात शोक व्यक्त होत आहे.

# सह दुय्यम उपनिबंधक कार्यालय परिसरातून दुचाकी चोरीस

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील शिवाजीनगर परिसरातील उपनिबंधक कार्यालयासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

वाघी तांडा ता. नांदेड येथील रहिवासी साहेबराव धेनु चव्हाण हे मंगळवारी दि. २८ एप्रिल रोजी नांदेड येथील सह दुय्यम उपनिबंधक कार्यालयात कामानिमित्त आले होते. त्यांनी आपली एमएच २६ बी एफ २२७१ क्रमांकाची पॅशन प्रो दुचाकी कार्यालयासमोर उभी केली होती. दुपारी १ ते २ वाजेदरम्यान अज्ञात व्यक्तींनी लंपास केल्याची घटना घडली आहे. सह दुय्यम उपनिबंधक कार्यालयातील कामकाज आटोपून बाहेर आल्यानंतर दुचाकी वाहन जागेवर दिसून आले नाही. त्यामुळे साहेबराव चव्हाण यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची भेट

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील विधानपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा बंगल्यावर घेतलेली भेट चर्चेचा विषय ठरली आहे. या भेटीत सुमारे पाऊणतास दोन्ही नेत्यांमध्ये खलबतं झाल्याची माहिती समोर आली असून, विधानपरिषद उमेदवारीबाबत महत्त्वाचे निर्णय झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यातील विधानपरिषद निवडणुकांसाठी उमेदवारांची घोषणा सुरू झाली आहे. भाजप आणि ठाकरे गटाने आपले उमेदवार जाहीर केले असताना, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. अशातच राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत उमेदवारीबाबत चर्चा रंगली होती. सूत्रांच्या माहितीनुसार, माजी आमदार झीशान सिद्दिकी यांचे नाव आघाडीवर असल्याचे समजते.या पार्श्वभूमीवरच सुनेत्रा पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात झालेली भेट महत्त्वाची मानली जात आहे.

# धावंडा वृक्षांवर रसायनांचा घाला:कृत्रिम डींकासाठी जंगल संपत्ती धोक्यात

किनवट/प्रतिनिधी-स्थानिक विभागीय वनविकास महामंडळ आणि प्रादेशिक वनविभागाच्या जंगली क्षेत्रात मध्यप्रदेशातील डींक व्यापाऱ्यांनी स्थानिकांच्या मदतीने धावंडा प्रजातीच्या वृक्षांवर केमिकल प्रक्रिया करून नैसर्गिक डींकाला छेद देऊन कृत्रिम डींकांवर भर दिलाय. परिणामतः आयुर्वेदिक मेवा असलेल्या वृक्षसंपत्तीचे वाळवंट केले जात आहे. गावपातळीवरील वनहक्क समित्या आणि पेसांतर्गतच्या समित्यांनी राष्ट्रीय वनसंपदा सुरक्षित ठेवण्यासाठी पुढे येऊन अशा वनउपजावर प्रतिबंध घालण्याची मागणी पर्यावरणप्रेमी कडून करण्यात आली आहे.

धावन्डा प्रजातीच्या वृक्षांना आयुर्वेदात अनन्य साधारण महत्व आहे. आरोग्य संपदेसाठी धावन्डा प्रजातीच्या वृक्षांचा डींक हा संजीवनी मानला जातो. अशा जंगली नैसर्गिक डींक मेव्यावर मध्यप्रदेशातील डींक व्यापाऱ्यांनी स्थानिकांच्या मदतीने धावंडा प्रजातीच्या वृक्षांना केमिकलचे इंजेक्शन देऊन कृत्रिम डींक काढण्यासाठी दरवर्षीच प्रयत्न चालवले आहेत. केमिकलयुक्त डींकामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येऊ लागले आहे असा वनप्रेमींचा आरोप आहे.


लोकारोग्य अबाधित ठेवण्यासाठी आरोग्य विभाग, प्रादेशिक वनविभाग, वनविकास महामंडळ आणि वनहक्क समित्या यांनी या प्रकरणाला हलक्यात न घेता गांभीर्याने घेऊन अशा कृत्रिम डींक निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे काळाची गरज असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.नैसर्गिक प्रक्रियेत १५ दिवसांतून केवळ १०० ते २०० ग्रॅम डींक मिळतो. मात्र, अधिक नफ्यासाठी झाडाच्या खोडावर कुऱ्हाडीने वार करून किंवा छिद्रे पाडून त्यात



रसायनयुक्त इंजेक्शनचा वापर केला आहे. त्यामुळे ३ ते ४ दिवसांतच अर्धा ते एक किलो डींक मिळतो.कृत्रिमरीत्या डिंक काढल्यामुळे झाडांची वयोमर्यादा झपाट्याने कमी होते अशी शंका उपस्थित केली असून असंख्य वृक्ष वाळून जात आहेत. भीमपूर, पिंताबरवाडी, घोगरवाडी, अंबाडी, शिवनराखेडा, धामनदरी अशा विविध जंगली क्षेत्रातून हे कृत्य केले जात आहे. मौल्यवान जंगल संपदा अबाधित राखण्यासाठी कुऱ्हाड बंदी करावी. सीसीटीव्हीयुक्त जंगल करावा अशी मागणी केली आहे.

# श्रीक्षेत्र राहेर येथे नृसिंह जन्मोत्सव उत्साहात साजरा

नायगाव/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र राहेर येथील अतिप्राचीन हेमाडपंथी श्रीलक्ष्मी नृसिंह मंदिरात वार्षिक नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि. ३० एप्रिल रोजी नृसिंह जन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.



यावेळी पूजाअर्चा, आरती, स्वरसाधना, कीर्तन तसेच जन्माख्यान आदी धार्मिक कार्यक्रमांचे विशेष आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना गावातील तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तीभावाने सहभाग नोंदवला.सदर सर्व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन राहेर येथील समस्त जोशी राहेरकर परिवारातर्फे करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला असून उपस्थितांनी या धार्मिक सोहळ्याचा मनमुराद आनंद लुटला.


# माहूर नगर पंचायत,माहूर जि.नांदेड

फोन नं.-०२४६०२८६१७५ Email ID-mahurco@gamil.com

जा.क्र.२०२६/नपंमा/वि.यो/टे-१/२७० दिनांक :- २९/०४/२०२६

## जाहिर निविदा सुचना

मुख्याधिकारी नगर पंचायत माहूर जि.नांदेड व्दारा खालील कामाकरिता नगर पंचायत निधीतून अनुभव असलेल्या कंत्राटदाराकडून/पुरवठादाराकडून जाहीर वार्षिक निविदा (सन २०२६-२७) मागविण्यात येत आहे.

| अ. क्रं. | कामाचे नाव | कोऱ्या निविदेची किंमत | ईसारा किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| | **पाणी पुरवठा विभाग** | | | |
| १ | पाणी पुरवठा विभागाशी संबधित मनुष्यबळ पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| | **विद्युत विभाग** | | | |
| १ | विद्युत विभागाशी संबधित मनुष्यबळ पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| | **अग्नीशमन विभाग** | | | |
| १ | अग्नीशमन विभागाशी संबधित मनुष्यबळ पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| | **मालमत्ता विभाग** | | | |
| १ | मालमत्ता विभागाशी संबधित मनुष्यबळ पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| | **लेखा विभाग** | | | |
| १ | द्विनोंद लेखापध्दती करणे बाबत. | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| २ | आयकर व GST भरणा करणेबाबत सल्लागार | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| | **नगर पंचायत माहूर कार्यालयासाठी साहीत्य पुरवठा करणे.** | | | |
| १ | विद्युत साहित्य पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| २ | जेसीबी मशीन/पोकलेंड/डंपर/डींपीग ट्रॉली ट्रॅक्टरस पुरविणे | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| ३ | बांधकाम साहित्याचा पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| ४ | ब्लिचिंग व तुरटी पुरविणे | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| ५ | कार्यालयीन कामासाठी स्टेशनरी साहित्य पुरविणे व इतर किरकोळ साहित्य पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| ६ | कार्यालयीन कामासाठी संगणक खरेदी, प्रिंटर, कारटेज व दुरुस्ती तसेच सी.सी.टीव्ही कॅमेरे दुरुस्ती व पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |
| ७ | पाणी पुरवठा कामासाठी सर्व साहीत्याचा पुरवठा करणे. व मोटार दुरुस्ती व पुरवठा करणे. व पा.पु.इतर साहीत्य. | २०० | १००० | ३१/०३/२०२७ पर्यंत |

**नियम व अटी:-**

१) निविदा दरपत्रक विक्रीचा कालावधी दिनांक:-३०/०४/२०२६ ते ०६/०५/२०२६ पर्यंत असेल. न.पं.कडून रोख किंमत भरल्यानंतर दरपत्रक मिळतील दिनांक:-०६/०५/२०२५ रोजी साय. ०६.०० वाजेपर्यंत अनामत रक्कमेसह स्वीकारले जातील.

२) अनुभवास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. व्दिलिफाफा पध्दतीने सादर करतांना लिफाफा क्र.०१ हा तांत्रीक बोलीचा असावा तर लिफाफा क्र.२ मध्ये दरपत्रक असावे. इसारा/अनामत रक्कम (EMD) ही रोखीने स्वीकारली जाईल.

३) EPF व ESIC, GST, IT प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.

४) कोणतीही एक किंवा सर्व दरपत्रक निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याच्या अटी व शर्तीत बदल करण्याच्या अधिकार मुख्याधिकारी, नगर पंचायत माहूर यांनी राखून ठेवलेला आहे.

स्वाक्षरित/-
**(विवेक भारत कांदे)**
मुख्याधिकारी,नगर पंचायत,माहूर

स्वाक्षरित/-
**(फिरोज कादर दोसानी)**
नगराध्यक्ष,नगर पंचायत,माहूर


## मटका अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील साठे चौकात सुरु असलेल्या मटका अड्डयावर पोलीसांनी बुधवारी धाड टाकुन दोन जणांना अटक केली.

शहरातील वर्दळीचे ठिकाण असलेल्या साठे चौकात मटका अड्डा सुरु करण्यात आला होता. बुधवारी दुपारी शिवाजीनगर पोलीसांनी मटका अड्डयावर धाड टाकुन मधुकर गायकवाड रा. दरवेशनगर व शेख अब्बास शेख नईम रा. नईआबादी यांना अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम व मटका घेण्याचे साहित्य पोलीसांनी जप्त केले.

# बीडीओ वानखेडे परत नायगाव पंचायत समितीमध्ये रुजू

नायगाव/प्रतिनिधी-सुमारे सहा महिन्यांपासून अनुपस्थित राहिलेले गटविकास अधिकारी पी. एन. वानखेडे यांची पुन्हा नायगाव पंचायत समितीत नियुक्ती झाल्याने तालुक्यात चर्चा आणि प्रश्नांचे वादळ उठले आहे. आधीच विविध वादांनी गाजलेल्या त्यांच्या कार्यकाळानंतरही त्यांनाच पुन्हा जबाबदारी देण्यामागे नेमके कारण काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

वानखेडे यांच्या आधीच्या कार्यकाळात घरकुल योजनेतील गैरव्यवहाराचे आरोप समोर आले होते. जनता दरबारात आ.राजेश पवार यांनी या प्रकरणातील अनियमिततेवर बोट ठेवत संबंधित कर्मचाऱ्यांकडून कबुली घेतली होती. त्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने ९ कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई केली होती. या संपूर्ण प्रकरणामुळे लाभार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले होते. या वादाच्या पार्श्वभूमीवर वानखेडे काही काळ रजेवर गेले होते. त्यांच्या अनुपस्थितीत प्रभारी अधिकाऱ्यांकडून कारभार चालू असताना परिस्थिती काही प्रमाणात स्थिर होत असल्याचे चित्र होते. मात्र, आता त्यांच्या पुनरागमनामुळे पुन्हा जुने प्रश्न डोके वर काढतील का, अशी भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय, त्यांच्या कार्यकाळात रोजगार हमी योजनेसह इतर योजनांमध्येही अनियमिततेबाबत चर्चा रंगल्या होत्या. पंचायत समितीत दलालांचा वाढता हस्तक्षेप आणि निर्णय प्रक्रियेवरील प्रश्न यामुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवरही बोट ठेवले जात आहे. अशा परिस्थितीत, वादग्रस्त पार्श्वभूमी असतानाही वानखेडे यांनाच पुन्हा नियुक्ती देण्याचा निर्णय का घेतला गेला, याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. आता पुढील काळात त्यांच्या कामकाजावर सर्वांचे लक्ष लागले असून, विश्वास परत मिळवणार की वाद वाढवणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# काँग्रेसने प्रादेशिक पक्षांवर डल्ला मारु नये!-खा.संजय राऊत

मुंबई/प्रतिनिधी-काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्षांच्या हक्कांचा आदर राखणे ही त्यांची जबाबदारी आहे. असे मत शिवसेना खा.संजय राऊत यांनी आज व्यक्त केले.



विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत तणाव निर्माण झाल्याचे चित्र दिसत असताना शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी काँग्रेसला थेट सुनावले आहे. उद्धव ठाकरे यांनी अंबादास दानवे यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर काँग्रेसने व्यक्त केलेल्या नाराजीवर राऊतांनी जोरदार प्रतिक्रिया दिली. महाविकास आघाडीत जागांचे वाटप परस्पर समन्वयातून व्हायला हवे. राऊतांनी काँग्रेसच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले की, प्रत्येक वेळी काँग्रेसच्या मनात शंका असतात. राज्यसभेच्या वेळीही शरद पवार यांच्या नावावरून शंका व्यक्त करण्यात आली होती. पण शेवटी पाठिंबा त्यांनीच दिला. यावेळी त्यांनी काँग्रेसवर अप्रत्यक्ष टीका करत ठपका शिवसेनेवर टाकण्याची सवय असल्याचेही नमूद केले. विधान परिषदेसंदर्भात बोलताना राऊत म्हणाले की, राज्यसभा शरद पवार यांना मिळाली, तर ही विधान परिषद शिवसेनेला मिळाली आहे. पुढील संधी काँग्रेसला मिळू शकते. यावर चर्चा होऊ शकते. त्यांनी काँग्रेसला संयम राखण्याचा सल्लाही दिला.दिल्लीतील राजकारणाचा उल्लेख करताना राऊत म्हणाले की, केंद्रात काँग्रेससोबत आम्ही ठाम उभे आहोत. डिलिमिटेशन विधेयकाला काँग्रेसने विरोध केला आणि त्यात आमचे खासदारही त्यांच्या बाजूने होते. मोदी सरकारला त्यावेळी पराभव स्वीकारावा लागला. पुढील राजकीय समीकरणांवर भाष्य करताना त्यांनी म्हटले की, २०२९ मध्ये जर संधी मिळाली, तर काँग्रेसचाच पंतप्रधान होऊ शकतो. मात्र त्यासाठी प्रादेशिक पक्षांना मजबूत करणे आवश्यक आहे.

पान १ वरुन

## विधान परिषद निवडणूक...

निवडणुकीनंतर विधान परिषदेतील काही दिग्गज सदस्यांचा कार्यकाळ संपणार आहे. यामध्ये उद्धव ठाकरे, नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, गोपीचंद पडळकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड, प्रवीण दटके आणि रमेश कराड यांचा समावेश आहे.निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार २३ एप्रिल रोजी अधिसूचना जारी करण्यात आली असून आज ३० एप्रिल ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख आहे. २ मे रोजी अर्जांची छाननी होणार आहे, ४ मेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. १२ मे रोजी मतदान व त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणी होईल, तर १३ मे रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे. एकूणच, अर्जांच्या संख्येमुळे ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता व्यक्त होत असून राजकीय वर्तुळात याची जोरदार चर्चा सुरू आहे.

## कारला लागलेल्या आगीत...

प्रथम स्थानिक रुग्णालयात उपचार करण्यात आले असून पुढील उपचारासाठी त्यांना जयपूर येथील सवाई मानसिंह रुग्णालयात हलवण्यात आले आहे.आग इतकी भीषण होती की मृतदेह अक्षरशः कोळशात परिवर्तित झाले. पोलिसांना अवशेष गोळा करण्यात मोठी कसरत करावी लागली. मृतांची ओळख पटवण्यासाठी डीएनए चाचणी करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. घटनास्थळी वैद्यकीय पथक तसेच फॉरेन्सिक सायन्स लॅबच्या तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

## भोंदूबाबा अशोक खरातला...

संशय आहे. तसेच पीडित कुटुंबांची आर्थिक फसवणूक केल्याचाही तपास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.मात्र आरोपीच्या वकिलांनी या युक्तिवादाला जोरदार विरोध केला.

## ठाकरेंच्या शिवसेनेला...

निर्णय घेतल्याने दानवेंना संधी देण्यात आली.या घडामोडींमुळे महाविकास आघाडीमध्ये एकजूट कायम असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले असून, आगामी निवडणुकांत भाजपविरोधात एकत्रित लढण्याचा निर्धार तिन्ही पक्षांनी व्यक्त केला आहे.

## ओबीसींच्या सर्वसमावेशक विकासावर...

माहिती पुस्तिका, वनार्टीच्या माहिती पुस्तिका तसेच महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाच्या पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले यासह कार्यक्रमात विभागाच्यावतीने देण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या चित्रफिती दाखविण्यात आल्या. या मेळाव्यात अनेक गरजू आणि होतकरू लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्जाचे वाटप करण्यात आले. तसेच, पालकमंत्री अतुल सावे आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना वाहनांच्या ताबा चावीचे वाटप करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. सदर कार्यक्रमाला नांदेड, लातूर, परभणी, धाराशिव आणि हिंगोली जिल्ह्यातील तरुण-तरुणी, विविध योजनांचे लाभार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर कविता मुळे, खा.डॉ.अजित गोपछडे, आ.बाबुराव कदम यांनीही विचार मांडले.

## श्रीमती रेखाबाई गहेरवार यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-लातूर येथील रेखाताई महाविरसिंह गहेरवार (वय ७०) यांचे आज दि.३० एप्रिल रोजी गुरुवारी सकाळी दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा आज रात्री ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळील निवासस्थानापासून निघणार असून त्यांच्या पार्थिवावर शहरातील शांतीधाम गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.



हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४